पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विभागांकरिता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : पीसीसी-३०१५/प्र.क्र.५४५/नवि-२२

मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.

दिनांक :- ३० ऑगस्ट, २०१९

वाचा:- १. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र.प्रशा/७/कावि/३३३/२०१६, दि.३०.०७.२०१६ चे पत्र.

२. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र. प्रशा/७/कावि/३५१/२०१६, दि.२५.०८.२०१६ चे पत्र.

३. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र. प्रशा/७/कावि/३८२/२०१६, दि.०७.०९.२०१६ चे पत्र.

४. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र. प्रशा/७/कावि/४१३/२०१६, दि.१०.११.२०१६ चे पत्र.

५. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र. प्रशा/७/कावि/९४/२०१७, दि.१०.०३.२०१७ चे पत्र.

६. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र. प्रशा/७/कावि/२९०/२०१७, दि.१४.०६.२०१७ चे पत्र.

७. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र. प्रशा/०७/कावि/५७२/२०१९, दि.०२.०७.२०१९ चे पत्र.

८. अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे क्र. प्रशा/ ७/ कावि/ ५०६/ २०१९, दि.११.०७.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील वाढती लोकसंख्या, नागरीकरणाचा झपाट्याने होणारा विकास, विकास कामांची वाढती व्याप्ती, विविध योजनेंतर्गत हाती घेतलेल्या विकास कामांमुळे सोयीसुविधाविषयक कामांत मोठ्या प्रमाणावार वाढ झालेली आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विविध संवर्गातील पदांमध्ये वाढ करणे, नवीन पदे/संवर्ग निर्माण करणेबाबत वेळोवेळी प्रस्ताव संदर्भाधीन पत्रांन्वये शासनास सादर केले होते. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी महानगरपालिकेच्या विविध संवर्गात विभागनिहाय नव्याने पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता.

त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आवश्यक पदे निर्माण करून महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधात अतिरिक्त पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील विविध संवर्गातील आस्थापना खर्चाची मर्यादा विचारात घेऊन सद्य:स्थितीत वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ च्या अत्यावश्यक (अग्निशमन व आरोग्य विभाग) पदांचा आकृतीबंध पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने संदर्भाधीन पत्रांन्वये मागणी केल्यामुळे या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ, ब, क मधील तक्त्यात दर्शविलेली ३९३ एवढी पदे नव्याने निर्माण करण्यास, तसेच प्रथमत:च नवीन निर्माण करण्यात येत असलेल्या पदांच्या बाबतीत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी प्रस्ताविल्यानुसार वेतनश्रेणी निश्चित करून त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५१ (४) नुसार शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सदर वाढीव पदांचा आकृतीबंध पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे :-

(१) नवीन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्चाच्या विहित मर्यादेत असल्यास विहित मार्गाने भरता येतील.

(२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकृतीबंधात अतिरिक्त पदे निर्माण करण्यास मान्यता देताना यापूर्वी मंजूर केलेल्या पदसंख्येपेक्षा जास्त अधिकारी/कर्मचारी महापालिकेत सध्या कार्यरत असतील तर अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना नव्याने निर्माण झालेल्या पदांवर सामावून घेता येणार नाही. मात्र सरळसेवेच्या कोट्यांतील पदांवर, पदोन्नती दिली असल्यास सरळसेवेतील उमेदवार उपलब्ध होईपर्यंत त्यांना पदोन्नतीचे कोणतेही हक्क प्राप्त न होता त्यांची पदोन्नती चालू ठेवता येतील. तसेच अतिरिक्त पदे निर्माण केल्यामुळे पदोन्नतीच्या कोट्यातील पद उपलब्ध होत असल्यास त्या पदांवर विहित प्रक्रिया पूर्ण करून पदोन्नती देता येईल अथवा नियमित करता येईल.

(३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीच्या अनुषंगाने अनुज्ञेय ग्रेड पे हे सदर पदाशी समकक्ष असलेल्या शासनाच्या पदांच्या ग्रेड पे पेक्षा जास्त अनुज्ञेय करण्यात येऊ नयेत.

(४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील भविष्यात निर्माण होणाऱ्या रूग्णालयांकरीता दर्शविण्यात आलेल्या पदांना रूग्णालये प्रत्यक्षात कार्यरत होतील त्यावेळी आवश्यकतेनुसार मंजूरी देता येईल. अशी प्रस्तावित रूग्णालये सुरू होण्याच्या संभाव्य दिनांकापूर्वी त्यासाठी आवश्यक असलेली पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा.

(५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ज्या सेवेवर बाह्य स्रोतांद्वारे (Out Sourcing) कर्मचारी भरणे शक्य व आवश्यक आहे, अशा सेवेवर बाह्य स्रोतांद्वारे (Out Sourcing) कर्मचारी भरण्यात यावेत.

(६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत प्रशासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची (Non-Technical) तांत्रिक व लेखा सेवेतील पदांवर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची प्रशासकीय सेवेतील पदांवर नियुक्ती करता येणार नाही.

३. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी परिच्छेद क्र.४ मधील अटी व शर्तींचे पालन करून सुधारित आकृतीबंधाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०९०४११३०२४६२२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay S Gokhale
Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: CN = Sanjay S Gokhale, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Urban Development
Date: 2019.09.05 16:51:55 +05'30'

(सं.श.गोखले)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत :- परिशिष्ट-“**अ**” ते परिशिष्ट-“**क**”

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
३) जिल्हाधिकारी पुणे.
४) महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जि. पुणे.
५) आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जि. पुणे.
६) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक.
७) कार्यासन अधिकारी (नवि-१४/नवि-२७), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती (नवि-२२)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नव्याने प्रस्तावित केलेल्या व शासनाने मंजूर केलेल्या वर्ग-१ च्या पदांचे विवरणपत्र

परिशिष्ट "अ"

अ.क्र	विभाग	संवर्ग	सध्याची मंजूर पदे	मंजूर करण्यात आलेली नविन पदे	आकृतीबंधातील एकूण पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	**सामान्य प्रशासन**	अतिरिक्त आयुक्त	२	१	३
		उप आयुक्त १५६००-३९१००+६६००	०	७	७
		एकूण	**२**	**८**	**१०**
२	**सुरक्षा**	मुख्य सुरक्षा अधिकारी १५६००-३९१००+५४००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
३	**लेखा**	उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी १५६००-३९१००+५४००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
४	**लेखापरिक्षण**	उप मुख्य लेखापरिक्षक १५६००-३९१००+५४००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	१
५	**वैद्यकीय**	सहा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी १५६००-३९१००+६६००	०	२	२
		वैद्यकीय उप अधिक्षक	१	१	२
		न्युरो फिजीशीयन १५६००-३९१००+७६००	०	१	१
		न्युरो सर्जन १५६००-३९१००+७६००	०	१	१
		युरो सर्जन १५६००-३९१००+७६००	०	१	१
		नेफ्रोलॉजिस्ट (Nefrologist) १५६००-३९१००+७६००	०	१	१
		प्लॅस्टिक सर्जन १५६००-३९१००+७६००	०	१	१
		एंडो क्रायनोलॉजिस्ट १५६००-३९१००+७६००	०	१	१
		गॅस्ट्रोटेरॉलॉजिस्ट १५६००-३९१००+७६००	०	१	१
		आन्को सर्जन १५६००-३९१००+७६००	०	१	१

		ऑन्को फिजीशीयन १५६००-३९१००+७६००	०	१	१
		निवासी वैद्यकीय अधिकारी १५६००-३९१००+६६००	०	२	२
		शहर क्षयरोग नियंत्रण अधिकारी १५६००-३९१००+६६००	०	१	१
		एकूण	**१**	**१५**	**१६**
६	**पशु वैद्यकीय**	मुख्य पशुसंवर्धन अधिकारी १५६००-३९१००+५४००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
७	**अभियांत्रीकी विभाग**				
	स्थापत्य	सह शहर अभियंता	३	२	५
		कार्यकारी अभियंता	१८	६	२४
	अणुविद्युत व दुरसंचार	सह शहर अभियंता (दूरसंचार) १५६००-३९१००+७६००	०	१	१
		कार्यकारी अभियंता , (दूरसंचार) (वायरलेस इंन्चार्ज पद समायोजित) १५६००-३९१००+६६००	०	१	१
	पर्यावरण	सह शहर अभियंता (पर्यावरण) १५६००-३९१००+७६००	०	१	१
	यांत्रिकी	कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) १५६००-३९१००+६६००	०	१	१
		एकूण	**२१**	**१२**	**३३**
८	**पाणी पुरवठा**	चिफ केमिस्ट १५६००-३९१००+६६००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
		एकूण	**२४**	**४०**	**६४**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नव्याने प्रस्तावित केलेल्या व शासनाने मंजूर केलेल्या वर्ग-२ च्या पदांचे विवरणपत्र

परिशिष्ट "ब"

अ. क्र.	विभाग	संवर्ग	सध्याची मंजूर पदे	मंजूर करण्यात आलेली नविन पदे	आकृतीबंधा तील एकूण पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	**सामान्य प्रशासन**	प्रशासन अधिकारी	२४	२	२६
		लघुलेखक (उच्चस्तर)	१	१	२
		एकूण	**२५**	**३**	**२८**
२	**सुरक्षा**	सहाय्यक सुरक्षा अधिकारी	१	४	५
		एकूण	**१**	**४**	**५**
३	**विधि**	विधि अधिकारी	१	१	२
		एकूण	**१**	**१**	**२**
४	**समाज विकास**	महिला व बाल विकास अधिकारी ९३००-३४८००+४६००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
५	**नगरसचिव**	उप नगरसचिव ९३००-३४८००+५४००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
६	**लेखा**	लेखाधिकारी	१३	३	१६
		एकूण	**१३**	**३**	**१६**
७	**अग्निशमन**	विभागीय अग्निशमन अधिकारी ९३००-३४८००+४६००	०	२	२
		एकूण	**०**	**२**	**२**
८	**आरोग्य**	सहाय्यक आरोग्य अधिकारी	११	२	१३
		एकूण	**११**	**२**	**१३**
९	**वैद्यकीय**	दंत शल्य चिकित्सक	१	५	६
		मेट्रन	१	३	४
		असीस्टंट मेट्रन	३	४	७
		एकूण	**५**	**१२**	**१७**
१०	**स्थापत्य अभियांत्रीकी**				
	स्थापत्य	उप अभियंता (स्थापत्य)	७३	१०	८३
	दूरसंचार	उप अभियंता (दूरसंचार) १५६००-३९१००+५४००	०	२	२

	पर्यावरण	उप अभियंता (पर्यावरण) १५६००-३९१००+५४००	०	२	२
	वाहतूक व नियोजन	उप अभियंता (वाहतूक) (बीआरटी करीता)	१	१	२
		एकूण	**७४**	**१५**	**८९**
११	**पाणीपुरवठा**	केमिस्ट	२	५	७
		एकूण	**२**	**५**	**७**
१२	**माध्यमिक शिक्षण**	उप शिक्षण अधिकारी ९३००-३४८००+५४००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
१३	**सार्वजनिक वाचनालय**	ग्रंथालय प्रमुख ९३००-३४८००+४४००	०	१	१
		एकूण	**०**	**१**	**१**
		एकूण	**१३२**	**५१**	**१८३**

वर्ग-३ व वर्ग-४ च्या अत्यावश्यक/आवश्यक विभागाच्या पदांचे विवरणपत्र

परिशिष्ट "क"

अ.क्र	विभाग	संवर्ग	सध्याची मंजूर पदे	मंजूर करण्यात आलेली नविन पदे	आकृतीबंधातील एकूण पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	**अग्निशमन विभाग**	सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी ९३००-३४८००+४६००	०	२	२
		अग्निशमन केंद्र अधिकारी ९३००-३४८००+४४००	०	१२	१२
		उप अग्निशमन अधिकारी	८	१६	२४
		चालक तथा यंत्रचालक ५२००-२०२००+३०००	०	६०	६०
		प्रमुख अग्निशमन विमोचक (लिडिंग फायरमन)	१७	२३	४०
		अग्निशमन विमोचक (फायरमन)	१०१	१७२	२७३
		एकूण	**१२६**	**२८५**	४११
२	**आरोग्य विभाग**	किटक शास्त्रज्ञ ९३००-३४८००+४६००	०	१	१
		मलेरिया इन्स्पेक्टर	४	४	८
		किटक संघटक ५२००-२०२००+१९००	०	१	१
		आरोग्य निरिक्षक	५२	११	६३
		एकूण	**५६**	**१७**	७३
एकूण			**१८२**	**३०२**	४८४